# १४. भागाकार : भाग २

Z93HI5

## ❁ शाब्दिक उदाहरणे

◆ ५६ वह्यांचे ७ विद्यार्थ्यांत समान वाटप करा. प्रत्येकाला किती वह्या मिळतील ?

```
        ८
   ७) ५६
     - ५६
      ००
```

प्रत्येकाला ८ वह्या मिळतील.

**स्वाध्याय**

खालील उदाहरणे सोडवा.

१. तीन कंपासपेट्यांची एकूण किंमत ₹ ९० आहे, तर एका कंपासपेटीची किंमत किती ?

३) ९०

२. चार किलोग्रॅम गव्हाची किंमत ₹ ९२ आहे, तर एक किलोग्रॅम गव्हाची किंमत किती ?

४) ९२

३. ३१ लीटर दूध, ४ लीटर धारकता असलेल्या भांड्यांत ओतले. अशी किती भांडी पूर्ण भरतील ? पूर्ण न भरलेल्या भांड्यात किती दूध असेल ?

४) ३१

४. एका रांगेत ७ रोपे, अशा रीतीने ४९ रोपे बागेत लावायची आहेत, तर रोपांच्या किती रांगा होतील ?

७) ४९

५. कवायतीसाठी ५ समान रांगांत ४० मुले उभी राहिली, तर एका रांगेत किती मुले उभी राहिली ?

५) ४०

६. ८७ मणी आहेत. एका माळेत ९ मणी, अशा किती माळा तयार होतील ? किती मणी उरतील ?

९) ८७

## तीन अंकी संख्येला एक अंकी संख्येने भागणे

**मधूजवळ १०० रुपयांच्या ३ नोटा, १० रुपयांच्या ६ नोटा व १ रुपयाची ९ नाणी असे ३६९ रुपये आहेत. नीना, बीना व नागेश यांच्यामध्ये ते सारखे कसे वाटता येतील ?**

```
    १२३
३) ३६९
 - ३
   ०६
 -  ६
   ००९
 -   ९
     ००
```

प्रथम १०० रुपयांच्या ३ नोटा वाटू. ३ ÷ ३ = १ किंवा ३ ला ३ ने १ चा भाग जातो, म्हणजेच प्रत्येकाला १०० रुपयांची एक नोट मिळेल.

१० रुपयांच्या ६ नोटा तिघांत वाटायच्या. ६ ÷ ३ = २, म्हणजे प्रत्येकाला १० रुपयांच्या २ नोटा म्हणजे २० रुपये मिळतील.

९ रुपये तिघांत वाटायचे. ९ ÷ ३ = ३. म्हणजे प्रत्येकाला ३ रुपये मिळतील.

म्हणजे प्रत्येकाला १०० रुपये + २० रुपये + ३ रुपये = १२३ रुपये मिळतील.

उभ्या मांडणीत हा भागाकार शेजारी करून दाखवला आहे.

१२३ हा भागाकार आला, म्हणजे प्रत्येकाला १२३ रुपये मिळतील.

**स्वाध्याय**

पुढील भागाकार करा.

(१) ४) ४८४ (२) ३) ३९६ (३) ४) ४४८ (४) २) ४६८

- **आता १०० रुपयांच्या ४ नोटा, १० रुपयांच्या ६ नोटा आणि १ रुपयाची ५ नाणी असे ४६५ रुपये ५ जणांत वाटू.**

```
     ०
५) ४६५
 -  ०
    ४
```

४६५ रुपयांत १०० रुपयांच्या ४ नोटा आहेत. ४ मधून ५ ची शून्य पटच वजा करता येते. याचाच अर्थ १०० रुपयांची नोट कुणालाही मिळू शकत नाही, म्हणून भागाकारात शतकस्थानी ० लिहिला.

```
     ०९
५) ४६५
 -  ०
    ४६
 -  ४५
    ०१
```

१०० रुपयांच्या ४ नोटा सुट्या करून त्यांच्या १० रुपयांच्या नोटा केल्या. त्या ४० नोटा व पहिल्या ६ अशा १० रुपयांच्या एकूण ४६ नोटा. त्या पाच जणांत वाटू. ५ ची जास्तीत जास्त ९ पट ४६ मधून वजा करता येते, म्हणून ९ चा भाग देऊ.

४६ − ४५ = १, म्हणजे १० रुपयांची १ नोट उरली.

```
     ०९३
५) ४६५
 -  ०
    ४६
 -  ४५
    ०१५
 -   १५
     ००
```

ही १० रुपयांची नोट सुटी करून मिळालेले १० सुटे रुपये व पहिले ५ असे १५ सुटे रुपये ५ जणांत वाटू. ५ त्रिक १५, म्हणून ३ चा भाग जातो.

१५ − १५ = ० बाकी उरेल.

९३ हा भागाकार आला.

४६५ रुपये ५ जणांत समान वाटल्यास प्रत्येकाला ९३ रुपये मिळतील.

२
३) ६२९
− ६↓
०२

२०९
३) ६२९
− ६↓
०२
− ०
०२९
− २७
००२

◆ ६२९ ÷ ३ हा भागाकार करा.

क्रमाने शतक, दशक, एकक यांना ३ ने भागायचे.
३ दुणे ६, म्हणून ६ ला ३ ने भाग जातो. भागाकारात शतकस्थानी २ लिहिले. आता २ दशक खाली घेऊन भागाकार करू

२ मधून ३ ची शून्य पटच वजा करता येते, म्हणून भागाकारात दशकस्थानी ० लिहू. २ − ० = २, म्हणून २ दशक उरले.
२ दशकाचे २० एकक व पहिले ९ अशा २९ एककांना ३ ने भागायचे.
३ नवे २७ म्हणून ९ चा भाग जातो. २९ − २७ = २.
म्हणजे बाकी २ आणि भागाकार २०९ आहे.

**स्वाध्याय**

पुढील भागाकार करा.

(१) ४) ४९४  (२) २) ८१५  (३) ३) २४२  (४) ५) ४५५
(५) ६) ५७८  (६) ८) ९४५  (७) ७) ६४७  (८) ४) ९०८

४
२) ८००
− ८
००

४०
२) ८००
− ८
००
− ००
०००

४००
२) ८००
− ८
००
− ००
०००
− ०००
०००

◆ ८०० ÷ २ = किती ?

भाज्य ८०० व भाजक २ आहे.
८ श ला २ ने भागू. २ चोक ८, म्हणून ४ चा भाग बसला. भागाकारात शतक जागी ४ लिहू. ८ − ८ = ०, म्हणजे ० शतक उरले.

आता पुढे ० द ला २ ने भागू. शून्याला कुठल्याही संख्येने भागल्यास भागाकार शून्य येतो, म्हणून भागाकारात दशक जागी शून्य लिहू.

त्याचप्रमाणे पुढे ० ए ला २ ने भागल्यास भागाकार ० येतो, म्हणून भागाकारात एकक जागी ० लिहू. भागाकार ४०० आला व बाकी शून्य राहिली.

८०० ÷ २ या भागाकारात दशक आणि एककस्थानी शून्य लिहिले नाही, तर भागाकार ४०० ऐवजी ४० किंवा ४ असा चुकीचा लिहिला जाईल, म्हणून लक्षात घ्या, की **भागाकार करताना शून्याचा भाग गेला, तर ते शून्य भागाकारात योग्य स्थानी लिहावे.**

**स्वाध्याय**

पुढील भागाकार करा.

(१) ५०० ÷ ५  (२) ९०० ÷ ६  (३) १२० ÷ ४

## शाब्दिक उदाहरणे

◆ प्रत्येक मुलाला ४ याप्रमाणे १४८ गोट्या वाटल्या, तर किती मुलांना गोट्या वाटल्या?

```
      ०३७
  ४)  १४८
    – ०
      १४
    – १२
      ०२८
     – २८
       ००
```

## स्वाध्याय

खालील उदाहरणे सोडवा.

१. पेपरमिंटच्या १२६ गोळ्या ९ मुलांमध्ये समान वाटल्यास प्रत्येकाला किती गोळ्या मिळाल्या ?

९) १२६

२. एका शेतात ७ रांगांत ९८७ रोपे लावली. जर प्रत्येक रांगेतील रोपांची संख्या समान असेल, तर प्रत्येक रांगेत किती रोपे लावली ?

७) ९८७

३. एका खोलीत ३ विद्यार्थिनी, याप्रमाणे एका वसतिगृहात १३२ विद्यार्थिनींची सोय झाली, तर वसतिगृहातील किती खोल्यांत विद्यार्थिनींची सोय झाली ?

३) १३२

४. प्रत्येक गुच्छात ८ फुले, याप्रमाणे ३४० फुलांचे किती गुच्छ होतील ? किती फुले शिल्लक राहतील ?

८) ३४०

५. एका पुड्यात ६ बिस्किटे याप्रमाणे ६०० बिस्किटांचे किती पुडे होतील ?

६) ६००